# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या चालकांना ई-बस चालविण्याचे प्रशिक्षण

➢ **परिवहन महामंडळाच्या इतर चालकांना देखील उत्तम कामकाजासाठी प्रशिक्षणाचे धडे**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हातात घेतल्यापासून अनेक उपाययोजना व अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविलेले आहेत. माहे ऑगस्ट २०२३ मध्ये खासगी बस ठेकेदाराकडील कंत्राटी चालकांनी संप पुकारला होता. यापुढील काळात अशी परिस्थिती निर्माण झाल्यास पीएमपीएमएल च्या बससेवेवर कोणताही परिणाम होवू नये तसेच प्रवाशांना अपघात विरहीत व विना ब्रेकडाऊन सेवा मिळावी याकरीता अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांनी परिवहन महामंडळाकडील चालकांना ई-बस चालविण्याचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. त्यास अनुसरून पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या एकूण ४८४ चालकांना ई-बस चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले असून यामध्ये कायम पदावरील २७२ व बदली रोजंदारी हंगामी २१२ चालकांचा समावेश आहे.

पीएमपीएमएल च्या ताफ्यात एकूण २०८९ बसेस आहेत. त्यामध्ये ९९१ बसेस पीएमपीएमएल च्या मालकीच्या आहेत तर १०९८ बसेस ठेकेदारांच्या आहेत. ठेकेदारांकडील बसेसमध्ये ६४० बसेस सीएनजी तर ४५८ ई-बस आहेत. ऑगस्ट महिन्यात ई-बसवरील काही चालकांनी त्यांच्या मागण्यांसाठी संप पुकारला होता. ई-बसवरील चालकांच्या संपामुळे पीएमपीएमएल च्या सेवेवर काही प्रमाणात परिणाम झाला होता. ही बाब लक्षात घेवून परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांनी परिवहन महामंडळाकडील चालकांना ई-बस चालविण्याचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आणि दि. २६/०८/२०२३ पासून सुरू करण्यात आलेल्या या प्रशिक्षणांतर्गत परिवहन महामंडळाच्या एकूण ४८४ चालकांना ई-बस चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

याचबरोबर पीएमपीएमएल च्या मालकीच्या बसेस चालविणाऱ्या परिवहन महामंडळाकडील इतर चालकांना देखील बस संचलनामध्ये उत्तम कामकाज, अपघात व ब्रेकडाऊन विरहीत सेवा, प्रवाशांशी सौजन्यपूर्ण वागणूक, आर.टी.ओ. चे नियम इ. विषयांवर दि. २८/०७/२०२३ पासून प्रशिक्षण देणे सुरू असून दि. १५/१०/२०२३ पर्यंत परिवहन महामंडळाकडील एकूण ९७८ चालकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

---

दि. १६/१०/२०२३.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा.स.कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.